# दि तासगांव अर्बन को-ऑप बँक लि., तासगांव

प्रधान कार्यालय - गुरुवार पेठ, तासगांव, जि. सांगली

website : www.tasgaonbank.com



२०२२-२३

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई यांचे मार्फत दिला जाणारा कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सह. बँक पुरस्काराने सन्मानित पुणे विभागातून एकमेव बँक आपली बँक



२०२३-२४

2025

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष




## ९० वा

## वार्षिक अहवाल

सन २०२४-२५

ऑडिट वर्ग 'अ'

# दि तासगांव अर्बन को-ऑप बँक लि., तासगांव

## ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २०/०८/२०२५

**स्थळ : कोहिनूर मल्टीपर्पज हॉल, तासगांव विटा रोड, तासगांव, वेळ दुपारी ०१ : ३० वा**

## सन २०२४-२५ सालचा ९० वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनीनो, सस्नेह नमस्कार ,

दि तासगाव अर्बन को-ऑप बँकेच्या आजच्या ९० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित सर्व सभासद बंधू भगिनी यांचे प्रथम मी स्वागत करतो आपल्या बँकेने विकासाचा टप्पा अतिशय उत्तम रीतीने गाठला आहे. बँकेची सर्वसाधारण सभा म्हणजे आपणा सर्वांना एकत्र व एकाचेवळी भेटण्याचा आनंद घेण्याची मोठी संधी

तालुक्यातील छोटे - मोठे व्यावसायिक, व्यापारी, कारागीर, शेतकरी शेतमजूर यांच्या आर्थिक गरजा भागविता याव्यात यासाठी आपल्या बँकेची स्थापना दि. ०६/०२/१९३६ रोजी कै. रावबहाद्दूर सदाशिव बाबाजी शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून केली. कै. रावबहाद्दूर सदाशिव बाबाजी शेटे, कै.शंकर जगन्नाथ कुत्ते वकील आणि कै.महादेवराव गोपीनाथ हिंगमिरे तसेच त्या त्या काळातील अध्यक्ष उपाध्यक्ष संचालक मंडळ यांच्या कारकाळात बँकेची प्रगती झाली. दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने सर्वच स्तरावर चांगली कामगिरी पार पाडली आहे.

### सन २०२३- २०२४ ते सन २०२४-२०२५

| अ.क्र. | तपशील | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १) | सभासद संख्या | ९८३० | १००६९ | २३९ |
| २) | शेअर भांडवल | ४१७५५८२०=०० | ४८९०३७६०=०० | ७१४७९४०=०० |
| ३) | फंडस् | २९७६८००८६=०० | ३१४५१३२८१=०० | १६८३३१९५=०० |
| ४) | ठेवी | २४५२६५००७९=०० | २५८७३७७४७९=०० | १३४७२७४००=०० |
| ५) | कर्जे | १४८३७१०५१६=०० | १५२७५११७०१=०० | ४३८०११८५=०० |
| ६) | खेळते भांडवल | २९०४४०९२१७=०० | ३१३२२७४०६७=०० | २२७८६४८५१=०० |
| ७) | निव्वळ नफा | १९३७८३६९=०० | ३२४७९२१८=०० | १३१००८४९=०० |
| ८) | डिव्हीडंड | १२% | शिफारस १३% | १% वाढ |
| ९) | ऑडीट वर्ग | अ | अ | -- |

अहवाल सालात वरीलप्रमाणे बँकेने भरीव अशी कामगिरी केलेली आहे त्यासाठी मी माझे सहकारी संचालक व कर्मचारी यांना मनापासून धन्यवाद देतो व सदर अहवाल आपणापुढे मंजुरीसाठी ठेवत आहे त्यास आपण मंजुरी द्यावी अशी सर्वांना विनंती आहे.

**सभा -** अहवाल सालामध्ये दि. २७/०८/२०२४ रोजी आपल्या बँकेची ८९ वी वार्षिक सर्व साधारण सभा व संचालक मंडळाच्या १५ सभा घेणेत येऊन त्यामध्ये बँकेच्या दैनंदिन कामकाजासंबंधीचे निर्णय घेणेत आले.

**सभासद -** अहवाल सालात बँकेच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१) अ वर्ग सभासद -१००६९ २) ब वर्ग सभासद - ५७१

**भाग भांडवल व निधी -** चालू अहवाल सालामध्ये बँकेच्या भाग भांडवलात व निधीमध्ये उल्लेखनीय वाढ झालेली आहे. हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरून आपले लक्षात येईल.

| अ.नं. | तपशील | सन २०२३-२०२४ | सन २०२४-२०२५ | झालेली वाढ | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १) | भाग भांडवल | ४१७५५८२०=०० | ४८९०३७६०=०० | ७१४७९४०=०० | १७.११% |
| २) | राखीव व इतर निधी | २९७६८००८६=०० | ३१४५१३२८१=०० | १६८३३१९५=०० | ५.६५% |

**सी.आर.ए.आर. -**रिझर्व्ह बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आर.चे प्रमाण १२% असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचे सदरचे प्रमाण १८.३२% इतके आहे यावरून बँकेची सक्षमता दिसून येते.

**ठेवी -** आपल्या बँकेच्या दि. ३१/०३/२०२५ अखेर सर्व प्रकारच्या ठेवी रूपये २५८.७४ कोटी इतक्या आहेत.

**ठेव विमा योजना -** ठेवीदारांचे रू. ५.०० लाख इतक्या ठेव रक्कमेस डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन लि. मुंबई यांचे विमा संरक्षण आहे. बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा हप्त्याची रक्कम खालीलप्रमाणे भरली आहे.

| अ.नं. | भरणा केलेला दिनांक | आर. टी. जी. एस.क्रमांक | विमा हप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | २७/०५/२०२४ | आयसीआयसीआयबँक युटीआर आय-आयसीआयसीआर - २२०२४०५१४०३२१२८४३ | १७९१४४५=०० |
| २) | २६/११/२०२४ | आयसीआयसीआयबँक युटीआर आय-आयसीआयसीआर - २२०२४११२६०६४०६६५० | १८८३२५७=०० |
| | | एकूण | ३६७४७०२=०० |

**कर्जे –** बँकेने दिनांक – ३१/०३/२०२५ अखेर सभासदांना कर्जपुरवठा केला असून त्याची येणे रक्कम रु.१५२.७५ कोटी इतकी आहे.

**अग्रक्रम व दुर्बल घटक कर्जपुरवठा–** बँकेने केलेले कर्जवाटप हे रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार केले असून दि. ३१/०३/२०२५ अखेर अग्रक्रम क्षेत्रासाठी ८०.११ % व दुर्बल घटक क्षेत्रासाठी १३.३९ % इतका कर्जपुरवठा केलेला आहे.

**गुंतवणूक –** दिनांक – ३१/०३/२०२५ अखेर बँकेने रक्कम रु.१३५.५४ कोटी इतकी गुंतवणूक केली आहे. या शिल्लक निधीची कौशल्याने कायदेशीर व रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे गुंतवणूक करून त्यातून अधिकाधिक उत्पन्न मिळविणेचा प्रयत्न केलेला आहे.

**थकबाकी –** अहवाल सालाच्या सुरुवातीस थकबाकी रुपये ३४६=८६ लाख इतकी होती. त्याचे शेकडा प्रमाण २.३४% इतके होते. अहवाल सालअखेर थकबाकी रु.३४७=०८ लाख इतकी असून या थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण २.४१% इतके आहे.

(रक्कम लाखात)

| अ.नं. | तपशील | कर्ज प्रकरणे | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बँकेने विशेष वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीसाठी दिलेली १०१ खालील कर्ज प्रकरणे | ५५ | २२७=१५ |
| २) | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे १०१ खालील दाखल केलेली प्रकरणे | ३ | ५७=५९ |
| ३) | बँकेने विशेष वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीसाठी दिलेली ९१ खालील कर्ज प्रकरणे | ४ | ०=०१ |
| ४) | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे ९१ खालील दाखल केलेली प्रकरणे | १ | ४=१६ |
| ५) | बँकेने कायदेशीर कारवाई न केलेली प्रकरणे | ७७ | ५८=१७ |
| | **एकूण** | **१४०** | **३४७ = ०८** |

**उत्पन्नक्षम नसलेली कर्जे – (एन.पी.ए.)** दि. ३१ मार्च २०२५ अखेर बँकेचे एकूण येणे कर्ज रु.१५२=७५ कोटी पैकी एकूण ढोबळ एन.पी.ए. कर्ज रक्कम रु. ५.०६ कोटी इतकी आहे. येणे कर्जाशी ढोबळ एन.पी.ए.चे शेकडा प्रमाण ३.३१% इतके असून निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ०% इतके आहे. बँकेची एन.पी.ए. कर्जाची वसुली चांगली झालेली आहे.

**लेखापरीक्षण व हिशोब तपासणी –** सन २०२४ – २०२५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण मा.कुंभोजकर कुलकर्णी देशपांडे अँड. असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंट, सांगली यांनी पूर्ण केले असून दि. ३१/०३/२०२५ अखेरच्या बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून ऑडीट वर्ग अ दिला आहे. बँकेच्या कामकाजासंदर्भात त्यांनी केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच मा. सचिन अबदार अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, विटा यांनी अंतर्गत लेखापरीक्षण पूर्ण केले असून दि. ३१/०३/२०२५ अखेरच्या बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी अंतर्गत लेखा परीक्षणादरम्यान केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत.

**नफा विभागणी –** अहवाल सालात बँकेस रुपये – ३२४७९२१८.६२ सन २०२३–२४ शिल्लक नफा रू.१०१=१५ इतका असून एकूण शिल्लक ३२४७९३१९=७७ नफा विभागणीस पात्र आहे. सदर नफा विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी संचालक मंडळाने शिफारस केली आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | मागील शिल्लक नफा | १०१=१५ | रिझर्व्ह फंड २५% प्रमाणे | ८१२००००=०० |
| २) | चालू सालचा नफा | ३२४७९२१८=६२ | जनरल रिझर्व्ह फंड १०% प्रमाण | ३२४७९२२=०० |
| ३) | | | लाभांश १३% प्रमाणे | ५६३०३३८=०० |
| ४) | | | सोशल फंड १% प्रमाणे | ३२४७९२=०० |
| ५) | | | IFR | ६६५६०००=०० |
| ६) | | | इमारत निधी | ८००००००=०० |
| ७) | | | सभासद कल्याण निधी | ५०००००=०० |
| ८) | | | शिल्लक नफा | २६७=७७ |
| | **एकूण** | **३२४७९३१९=७७** | **एकूण** | **३२४७९३१९=७७** |

तरी वरीलप्रमाणे सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणेत यावी अशी विनंती आहे.

**सामाजिक बांधिलकी –** आपल्या बँकेने १०/०८/२०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर केलेप्रमाणे दि. १५/०८/२०११ रोजीपासून सभासद अथवा सभासदाचे मुलास/मुलीस कन्यारत्न झालेस एक वर्षाचे आत त्याचा लाभ घेणेसाठी बँककडे नाव नोंदणी किंवा मागणी केली पाहिजे त्यानंतर बँकेतर्फे रू.५०००/– इतकी ठेव अशा मुलीच्या नावे ठेवणेत येते. मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झालेनंतर त्या मुलीस ठेव पावतीची रू.२०८०६/– इतकी रक्कम देणेत येते. अहवाल सालात एकुण ३१ कन्यारत्नांना एकुण रु. १५५०००/– इतक्या रक्कमेचा या योजनेद्वारे लाभ देणेत आला आहे.

**जेष्ठ नागरिक व विधवा महिलांना जादा व्याजदर –** बँकेने एक सामाजिक जबाबदारी म्हणून जेष्ठ नागरिकांना व विधवा महिलांना त्यांच्या मुदत ठेवीवर ०.५०% जादा व्याजदर देणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

**सोलर एनर्जी प्रकल्प :** बँकेने प्रधान कार्यालयामध्ये वीज बचत होण्यासाठी १९.५० केव्हीए चा सोलर एनर्जी प्रकल्प बसविला आहे.

**आभार –** बँकेच्या प्रगतीमध्ये माझे सहकारी संचालक, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,असि.जनरल मॅनेजर, शाखाधिकारी व कर्मचारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांनी जे आपुलकीने सहकार्य दिले त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. तसेच मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सांगली, मा. विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली, मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तासगांव, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक्स फेडरेशन लि.,मुंबई., दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक्स असोसिएशन लि.,मुंबई, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप., बँक लि.,मुंबई, स्टेट बँक ऑफ इंडिया, सांगली जिल्हा मध्य.सहकारी बँक लि.सांगली, युनियन बँक ऑफ इंडिया, ॲक्सीस बँक लि., बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय बँक, सांगली जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. सांगली, इ. यांचे वेळोवेळी बँकेला सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे. मा. संजयकाका पाटील

## दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०२४ | भांडवल व देणी | दि. ३१/०३/२०२५ |
|---|---|---|
| ७००००००००=०० | अधिकृत भाग भांडवल | ७००००००००=०० |
| ४१७५५८२०=०० | वसूल भाग भांडवल | ४८९०३७६०=०० |
| २९७६८००८६=५३ | राखीव व इतर निधी | ३१४५१३२८१=१४ |
| २४५२६५००७९=८१ | ठेवी | २५८७३७७४७९=०५ |
| १५०३०२८६=५० | ओव्हर ड्यू इंटरेस्ट रिझर्व्ह | १३२२९५६८=६० |
| ६२४४६७३८=०० | देणे व्याज | १०६८८३४८७=७७ |
| ३०४९८०११=७६ | इतर देणे | ४२११६८४०=३५ |
| | नफा तोटा | |
| १११=१६ | मागील शिल्लक नफा | १०१=१५ |
| १९३७८३६९=६० | चालू सालचा नफा | ३२४७९११७=४७ |
| **२९१५६७८६७५=४४** | **एकूण** | **३१४५५०३६३५=५३** |
| १५८१२३४०=०८ | बँक गॅरंटी | १२०६२१६६=७९ |

## ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा तोटा पत्रक

| दि. ३१/०३/२०२४ | खर्चाचा तपशील | दि. ३१/०३/२०२५ |
|---|---|---|
| १५५८२०५८४=४० | ठेवी व घेतलेल्या कर्जावरील दिलेले व्याज | १९८२३४८८६=७९ |
| २०६९९९८२=०० | पगार, अल्लोंसेस व प्रॉ. फंड वर्गणी | ३७८३४८४२=६७ |
| ६६७१७०=०० | संचालक मंडळ भत्ते व अलोंसेस | ७७३०००=०० |
| ६५४८७०=८७ | भाडे, कर, विमा व लाईट बील | ७११०८३३=८८ |
| ४७५२९=५८ | कोर्ट खर्च व वकील फी | १७९४६३=५९ |
| २५०००=०० | ऑडीट फी | ५१८०००=०० |
| ५३८२२८=५२ | टपाल, तार व टेलिफोन खर्च | ८००८२२=०६ |
| ३३०८५६०=६२ | मालमत्तेची दुरुस्ती व घसारा | ५२३८४४९=९३ |
| ८१३४९८=८४ | स्टेशनरी, छपाई व जाहिरात | ५५५२९३=६५ |
| ७९४६२४५=६७ | इतर खर्च | ९२६९५३८=२७ |
| ४५०४३५१४=०० | इतर तरतुदी | १५३८९००२=०० |
| १९३७८३६९=६० | निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग | ३२४७९११७=४७ |
| **२६०८३७३९७=०१** | **एकूण** | **३०८३८३२५०=३१** |

मा. खासदार व माजी उपाध्यक्ष कृष्णा खोरे विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य, मा. श्री. सुमनताई आर. आर. पाटील, माजी आमदार तासगांव कवठेमहांकाळ विधानसभा मतदार संघ, मा. श्री. रोहित (दादा) आर.आर. पाटील, आमदार, तासगांव–कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघ मा. श्री. अविनाश (काका) पाटील उपाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, यांनी बँकेच्या प्रगतीसाठी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. पुन्हा एकवेळ आपण सर्वांनी बँकेच्या प्रगतीसाठी दिलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानून मा. संचालक मंडळाच्यावतीने सादर केलेला ९० वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, हिशोब पत्रकास मंजुरी द्यावी अशी विनंती करून हा अहवाल सादर करतो.

आपला नम्र,

**जय हिंद ! जय सहकार !!**

**महेश्वर म. हिंगमिरे**
अध्यक्ष

## दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०२४ | मालमत्ता व येणी | दि. ३१/०३/२०२५ |
|---|---|---|
| २२९९९४११८=८८ | रोख व बँकेतील शिल्लक | १८४८८०५९१=६४ |
| ११३१७५३९९०=०५ | गुंतवणूक | १३५५४०४०७३=४० |
| १४८३७१०४१६=८० | कर्जे | १५२७५११७०१=०९ |
| १५०३०२८६=५० | येणे व्याज | ३९४४५६१३=६० |
| ९५३४९००=०० | जागा (घसारा वजा जाता) | ९६४७६३७=०० |
| १२७३०८१=६३ | इमारत (घसारा वजा जाता) | २६३७४३३=०९ |
| ९४८६३९२=४२ | डेडस्टॉक | ८७४२६०४=५९ |
| ३०७४३८=७४ | शिल्लक प्रिंटींग आणि स्टेशनरी | ३६२२०५=१५ |
| ७७६८९९=१६ | सेफ डिपॉझिट लॉकर | १०९१५५७=४० |
| १७९९८७११=१८ | डिपॉझिट व इतर येणी | १५७८०२१८=५७ |
| **२९१५६७८६७५=४४** | **एकूण** | **३१४५५०३६३५=५३** |
| १५८१२३४०=०८ | बँक गॅरंटी | १२०६२१६६=७९ |

## ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा तोटा पत्रक

| दि. ३१/०३/२०२४ | उत्पनाचा तपशील | दि. ३१/०३/२०२५ |
|---|---|---|
| २५८८६३७५५१८=०० | कर्ज व गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | ३०४८००५३७=५६ |
| १२९९१९=२८ | कमिशन एक्स्चेंज व ब्रोकरेज | ३४३०८७=३७ |
| १८४४३७२२=६४ | इतर जमा | ३२३९६२५=३८ |
| **२६०८३७३९७=०१** | **एकूण** | **३०८३८३२५०=३१** |

# सन २०२५-२६ सालाकरीता अंदाजे बजेट


| अ.नं. | तपशील (उत्पन्न) | २०२४-२०२५ मागील अंदाज | २०२४-२०२५ प्रत्यक्ष उत्पन्न | २०२५-२०२६ पुढील अदाज |
|---|---|---|---|---|
| १) | व्याज व डिस्काऊंट (सरप्लस) | ११००००००००.०० | ३०४८००५३७=५६ | ३६००००००० =०० |
| २) | कमिशन,एक्सचेंज व ब्रोकरेज | ५००००००.०० | ३४३०८७=३७ | ५००००००=०० |
| ३) | इतर जमा | ३००००००.०० | ३२३९६२५=३८ | ४००००००=०० |
| | एकूण | ११८००००००.०० | ३०८३८३२५०=३१ | ३६९००००००=०० |

| अ.नं. | तपशील (खर्च) | २०२४-२०२५ मागील अंदाज | २०२४-२०२५ प्रत्यक्ष खर्च | २०२५-२०२६ पुढील अदाज |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवींवर दिलेले व्याज | ३०००००००.०० | १९८२३४८८६.७९ | २०००००००००.०० |
| २ | पगार,अल्लौन्सेस,प्रा.फंड,प्रशिक्षण व स्टाफ ड्रेस | ३५००००००.०० | ३७८३४८४२.६७ | ४०००००००.०० |
| ३ | संचालक मंडळ भत्ते | ७०००००.०० | ७७३०००.०० | ७७५०००.०० |
| ४ | ऑडीट फी | ४५०००.०० | ५१८०००.०० | ६०००००.०० |
| ५ | भाडेकर, दिवाबत्ती, विमाखर्च, व्यवसायकर | ६५०००००.०० | ७११३२३२.७३ | ८००००००.०० |
| ६ | टपाल, तार व पोस्टेज | ५५००००.०० | ८००८२२.०६ | ८५००००.०० |
| ७ | स्टेशनरी, छपाई व जाहिरात | ९०००००.०० | ५५५२९३.६५ | ६०००००.०० |
| ८ | मालमत्तेची दुरुस्ती व घसारा | ६०००००.०० | ५२३८४४९.९३ | ५३००००००.०० |
| ९ | अल्पबचत कमिशन | १९५००००.०० | १८३६५०४.१० | २००००००.०० |
| १० | जनरल मिटिंग खर्च | १५००००.०० | २३६४०४.२४ | २५००००.०० |
| ११ | वर्तमान पत्र खर्च | १००००.०० | ७०३०.०० | १००००.०० |
| १२ | बँक असोशीयशन वर्गणी | ७००००.०० | ७००००.०० | ७००००.०० |
| १३ | ॲड्व्हायझरी व सर्विस चार्जेस | ३०००००.०० | १८३८५६.१६ | ३०००००.०० |
| १४ | हॉटेल खर्च | ६०००००.०० | ५५६८९१.२० | ६०००००.०० |
| १५ | अल्पबचत बक्षीस योजना | १००००.०० | १७५०.०० | ५०००.०० |
| १६ | प्रवास खर्च | १५००००.०० | १८६०५०.०० | २०००००.०० |
| १७ | समारंभ खर्च | ३०००००.०० | ८९०९०.६६ | १०००००.०० |
| १८ | देणगी व वर्गणी | १०००००.०० | ४४०००.०० | ५००००.०० |
| १९ | वार्षिक अहवाल छपाई | ५००००.०० | ४३६२०.०० | ५००००.०० |
| २० | झेरॉक्स खर्च | २५०००.०० | १७५२४.०० | २००००.०० |
| २१ | कर्ज वसुली खर्च | ५०००.०० | ०.०० | ५०००.०० |
| २२ | लाईट फिटिंग खर्च | ५००००.०० | २१८९६.०० | ५००००.०० |
| २३ | सभासद प्रशिक्षण खर्च | १००००.०० | ५०००.०० | १००००.०० |
| २४ | रिबेट | १५००००.०० | १३९२२४९.०० | १४०००००.०० |
| २५ | इंधन खर्च | ३०००००.०० | ३१५२७६.७९ | ४०००००.०० |
| २६ | किरकोळ खर्च | २०००००.०० | २०५६९०.९८ | २५००००.०० |
| २७ | संगणक व इतर एएमसी खर्च | ४५००००.०० | ४३२९७१.१८ | ४०००००.०० |
| २८ | ए.टी.एम. चार्जेस | ०.०० | १५५८५३.९९ | १६००००.०० |
| २९ | इश्यूअर एन.पी.सी.आय. स्विचिंग फी | ०.०० | १५३२.८९ | २०००.०० |
| ३० | शाखा बक्षीस | २५०००.०० | ०.०० | ०.०० |
| ३१ | जी.एस.टी. | १००००००.०० | ३४२१८४७.०८ | ३५०००००.०० |
| ३२ | लीगल चार्जेस | ३०००००.०० | १७९४६३.५९ | ३०००००.०० |
| ३३ | इतर तरतूदी | १५००००००.०० | १५३८९००२.०० | १५००००००.०० |
| ३४ | व्हाट्सएप चॅटबॉट खर्च | ०.०० | ४२०००.०० | ४३०००.०० |
| ३५ | एकुण खर्च | ९५५०००००.०० | २७५९०४०३१.६९ | ३२९००००००.०० |
| ३६ | दि.३१/०३/२०२५ चा निव्वळ नफा | २२५०००००.०० | ३२४७९२१८.६२ | ०.०० |
| ३७ | दि.३१/०३/२०२६ चा संभाव्य नफा | ०.०० | ०.०० | ४०००००००.०० |
| | एकूण | ११८००००००.०० | ३०८३८३२५०.३१ | ३६९००००००.०० |

**शाखा विस्तार** ▶ मुख्य कार्यालय (०२३४६) - २४१२९०,२४१२९१

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शाखा तासगांव | शाखा सावळज | शाखा मणेराजुरी | शाखा सांगली | शाखा कुपवाड | शाखा क. महांकाळ |
| ८९५६११६४६६ | ८९५६११६४६८ | ८९५६११६४७० | ८९५६११६४७३ | ८९५६११६४७४ | ८९५६११६४६७ |
| शाखा पलूस | शाखा जत | शाखा माधवनगर | शाखा विटा | शाखा पंढरपूर | शाखा सोलापूर |
| ८९५६११६४७८ | ८९५६११६४८१ | ८९५६११६४७७ | ८९५६११६४८६ | ८९५६११६४८४ | ८९५६११६४७६ |

बँकेचे संस्थापक



कै. रावबहाद्दूर सदाशिवराव बाबाजी शेटे

बँकेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा



कै. शंकर जगन्नाथ कुत्ते वकील
माजी चेअरमन

बँकेचे कुटुंब प्रमुख व मा. चेअरमन



कै. महादेवराव गोपिनाथ हिंगमिरे

## संचालक मंडळ



श्री. महेश्वर म. हिंगमिरे
चेअरमन



श्री. कुमार रा. शेटे
व्हा. चेअरमन



श्री. सदाशिव बा. शेटे
संचालक



श्री. अरुण प. पाटील
संचालक



श्री. विनय मु. शेटे
संचालक



श्री. अनिल गुं. कुत्ते
संचालक



श्री. उदय तु. वाटकर
संचालक



श्री. धोंडीराम खा. सावंत
संचालक



श्री. रामशेठ आ. शेटे
संचालक



श्री. राजेंद्र ना. माळी
संचालक



श्री. सौरभ रा. हिंगमिरे
संचालक



श्री. उदय गो. डफळापूरकर (सी.ए.)
तज्ञ स्वीकृत संचालक



ॲड. श्री. आशिष अ. अडगळे
तज्ञ स्वीकृत संचालक



श्रीमती सविता स. पैलवान
महिला संचालिका



सौ. उमा कै. हिंगमिरे
महिला संचालिका



श्रीकांत स. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

## व्यवस्थापन मंडळ सदस्य



श्री. रविंद्र विश्वनाथ देवधर



श्री. अवधूत जगन्नाथ गडकर



श्री. प्रदीप आप्पासो पवार

# दि तासगांव अर्बन को-ऑप. बँक लि., तासगांव

**गुरुवार पेठ, तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली**

## ९० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

सन्माननीय सर्व सभासदांना कळविणेत येते की, **दि तासगांव अर्बन को-ऑप. बँक लि., तासगांव** या बँकेची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २०-०८-२०२५** रोजी **दुपारी ठीक १.३० वाजता कोहिनूर मल्टी पर्पज हॉल,** तासगांव-विटा रोड, तासगांव येथे मा. चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेकरिता सभेच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे अशी नम्र विनंती आहे.

### ※ सभेपुढील विषय ※

१) दि. २७/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

३) दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके वाचून स्वीकृत करणे.

४) संचालक मंडळाने सन २०२४-२०२५ या वर्षातील नफ्याची विभागणी सुचविली आहे त्यास मंजुरी देणे.

५) सन २०२४-२०२५ मध्ये बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२५-२०२६ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे मा. संचालक मंडळाने सुचविलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.

६) सन २०२४ - २०२५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या मा. कुंभोजकर, कुलकर्णी, देशपांडे अँड असोसीएट्स चार्टर्ड अकौटंट, सांगली यांच्या तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे व स्वीकारणे.

७) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या झालेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास अनुसरुन बँकेने सहकार खात्याकडे सादर करणेत आलेल्या दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.

८) आर्थिक वर्ष २०२५ - २०२६ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाठी अंतर्गत लेखापरीक्षकाची तसेच इतर सर्व प्रकारचे लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकांची निवड करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

९) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ करीता वैधानिक लेखापरिक्षणासाठी बँकेच्या संचालक मंडळाने रिझर्व बँकेला शिफारस केलेल्या सनदी लेखापरिक्षकांची नोंद घेणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.

१०) अहवाल सालात महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार व एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेनुसार ज्या कर्जदारांना सवलत दिली आहे. त्याबाबत आढावा घेणे.

११) मा. अध्यक्षसो, यांचे अनुमतीने आलेल्या आयत्यावेळच्या विषयावर विचार विनिमय करणे.

**मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार**

स्थळ : **तासगांव**
दिनांक : ०१-०८-२०२५

**श्री. श्रीकांत सदाशिव कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. महेश्वर महादेव हिंगमिरे**
अध्यक्ष

---

**विशेष सूचना-**

१) सदर सभा कोरमअभावी तहकूब झालेस ही सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी घेणेत येईल. अशा सभेस आवश्यक गणपुर्तीचे बंधन असणार नाही. २) सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून मोबा. क्रमांक, ई-मेल, व्हॉटस्ॲप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाची नोंद करावी. ३)बँकेच्या सभासदांना सभेच्यावेळी बँकेच्या कामाकाजासंदर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते प्रश्न सोमवार दि. १८/८ /२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी सादर करावेत. ४) ज्या सभासदांच्या वयाची ७१ वर्षे पूर्ण केलेबद्दल बँकेमार्फत सत्कार यापूर्वी झालेला आहे. त्या सभासदांना सोडून ज्या सभासदांचे वयास ७१ वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांनी आपली नांवे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी तीन दिवस अगोदर प्रधान कार्यालय येथे देऊन सहकार्य करावे. सोबत वयाचा पुरावा म्हणून जन्मतारखेचा दाखला आणावा. ५) सभासदांनी मागणी केल्यास अहवालाची प्रत नजीकच्या शाखेत मिळेल.

**प्रेषक :**

**श्री. महेश्वर महादेव हिंगमिरे, अध्यक्ष**

दि तासगांव अर्बन को-ऑप. बँक लि., तासगांव
२३९६,बी,गुरुवार पेठ, तासगांव, जि. सांगली.

मुद्रक : माधव आर्ट प्रिंटर्स, तासगांव/९८५०७७४००९

प्रति,
श्री./सौ. ____________________
____________________
मु. पो. ____________________
ता. ____________ जिल्हा ____________